**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue 40 , Vol. 2 (Indexed) March. 2021 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

**Impact Factor – 7.139 ISSN – 2319-8648**

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**March 2021 Special Issue- 40 Vol. 2**

**Chief Editor**

**Mr. Arun B. Godam**

**Shaurya Publication , Latur**

## CURRENT GLOBAL REVIEWER

Issue 40 , Vol. 2 (Indexed) March. 2021 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

# Index


1. हबीब तनवीर कृत नाटक 'आगरा बाज़ार' पर नजीर का प्रभाव — 6
श्री नागेश सदानंदे, डॉ. बाळसाहेब सोनवणे

2. उपन्यास 'अम्रत और विष' आधुनिक समाज का यथार्थवादी दस्तावेज — 12
प्रा.डॉ.शहाजी बाला चव्हाण

3. छत्रपती शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण — 15
डॉ. कांबळे आर. एस.

4. मराठवाडा विभागातील बॉल-बॅडमिंटन या खेळाची सद्यस्थिती व भवितव्य. — 18
प्रा.डॉ.राजेंद्र सुर्यवंशी

5. छत्रपती शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण — 21
डॉ. कांबळे आर. एस.

6. धर्मनिरपेक्षता और पंडित दीनदयाल उपाध्याय का राष्ट्रवादी चिंतन — 24
बाबूलाल मीणा, डॉ विभा कौशिक

7. लोकल फॉर वोकल कोविड–19 के संदर्भ में — 27
डॉ. देवेश रंजन त्रिपाठी, डॉ. अदिती गोस्वामी

8. देगलूर तालुक्यातील तडखेल, खानापूर, नरंगल, येरगी, देवापूर आणि बेंम्बरा येथील शिलालेखांचा अभ्यास — 30
सौ.नागेश्वर अनिता मोहनराव

9. गोविंद (गोपाळ) गणपत महार व छत्रपती संभाजी महाराज — 34
प्रा.डॉ. शिवाजी गाढे

10. पर्यावरणात्मक कृषीक्षेत्राचा आर्थिक विकास एक अभ्यास — 39
प्रा. डॉ. सर्जेराव गंगाधर गोल्डे

11. पूर्व विदर्भातील आदिवासी समाजाचे अध्ययन केंद्र गोटूल / युवागृह — 45
प्रा. डॉ. आनंद के. भोयर,

12. प्रवासी साहित्यकार राजेंद्र यादव के ललित साहित्य में राम कथा का व्यवहारिक पक्ष — 51
अनुपमा तिवारी

13. प्राचीन काळातील तेर — 54
अनिल तानाजी जाधवर

14. 2014 लातूर लोकसभा (अनु.जाती) मतदारसंघाची निवडणूक — 59
जितेंद्र वामराव गायकवाड

15. बालकामगार : एक सिंहावलोकन — 63
प्रा.डॉ. डी.एन. दामावले




39

# CURRENT GLOBAL REVIEWER

Issue 40 , Vol. 2 (Indexed) March. 2021 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139



16. 'अण्णा भाऊ साठे : जीवन व कार्य' 66

प्रा. डॉ. भुजंग पाटील

17. 'आळ आणि काळ : अर्थशास्त्रीय विश्लेषण' 70

प्रा. डॉ. शिवराज पाटील,

18. फकिरा: संघर्षाची कथा 74

प्रा. प्रशांत कांबळे

19. 'महात्मा फुले आणि स्त्री शिक्षण' 77

प्रा. डॉ. रजनी अ. बोरोळे

20. 'वारणेचा वाघ: समाजशास्त्रीय विश्लेषण' 80

प्रा. डॉ. एस. पी. घायाळ,

21. 'कोरोना काळातील कविता' 83

प्रा. डॉ. गोविंद काळे

22. विधीमंडळ कामकाजातील प्रश्नोत्तराचा तास : लोकप्रतिनिधींचे प्रमुख आयुध 88

प्रा.डॉ.एस यू ढाले

23. आदिवासी जमातीच्या समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास 92

डॉ.एन.आर. हुरगूळे




40

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue 40 , Vol. 2 (Indexed) March. 2021 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

# आदिवासी जमातीच्या समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ.एन.आर. हुरगूळे**
समाजशास्त्र विभागप्रमुख
शिवाजी महाविद्यालय,हिंगोली

---

**प्रस्तावना**

भारतामध्ये विविध जाती, धर्म आहेत. सहा हजारापेक्षा अधिक जाती आहेत. याचप्रमाणे विविध आदिवासी जमाती आहेत. देशातील सर्वच राज्यामध्ये आदिवासीच्या 250 जमाती आहेत. यामधील उपजातींचा विचार केल्यास हे प्रमाण 450 आहे.[1] स्वातंत्र्योत्तर काळात विकासाच्या प्रक्रियेने वेग घेतला आहे. विकासाच्या कक्षा रुंदावत असताना, विविध क्षेत्रात क्रांती घडून येत असताना भारतीय समाजाचा मुख्य भाग असणारी आदिवासी जमात मात्र या मुख्य प्रवाहापासून दूर असल्याचे दिसून येते. या जमातीचा फारसा विकास अद्यापर्यंत झालेला नाही. आदिवासी जमातींना आजही विविध प्रश्नांना तोंड द्यावे लागत आहे. त्यांच्या या प्रश्नाकडे शासनाने, समाजातील विविध घटकांनी, स्वयंसेवी संस्थांनी सहानुभूतीने पाहण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक आदिवासी जमातीचे सामाजिक जीवन, आर्थिक जीवन, सांस्कृतिक जीवन सारखे आढळत नाही. या प्रत्येक जमातीचे सामाजिक जीवन त्यांच्या सभोवतालच्या भौगोलिक, आर्थिक, आणि पारंपारिक चालत आलेल्या आणि रुढ झालेल्या जीवन सृष्टीने बनवलेले आहे. असे असले तरी सर्वसामान्य आदिवासीचे जीवन, त्यांची मुल्ये वैशिष्ट्ये यांच्यात सारखेपणा आढळतो. आदिवासी जमातीमधील व्यक्ती हा भोळाभाबडा, अबोल, प्रामाणिक, पापभिरु, दैववादी, परंपरागत जीवन दृष्टीचा, निसर्गाच्या सानिध्यात रमणारा, जीवनाचा स्वच्छंदतेने आनंद घेणारा आहे. त्याचे वास्तव्य जंगलात असले तरी त्यांची राहणी त्यांच्या निर्मळ अंत:करणाने साधी व सरळ असते. त्यांच्यातील आत्मीयता व सचोटी हे गुण वाखावण्यासारखे आहेत. त्यांची जीवनाकडे बघण्याची स्वतंत्र दृष्टी असली तरी या जमातीसमोर अनेक समस्या आहेत. यासमस्यांचा व त्या निवारणासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नाचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत अध्ययन विषयाची निवड केली आहे.

**उद्देश** :

"आदिवासी जमातीच्या समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास" या प्रस्तुत अध्ययन विषयावरील शोधनिबंधाची पुढील उद्देश आहेत.

1 आदिवासी जमातीच्या पारंपारिक जीवनपध्दतीमुळे निर्माण होणाऱ्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

2 आदिवासी जमातीच्या सामाजिक, आर्थिक व सास्कृतिक समस्या आहेत.

**गृहितके** :

"आदिवासी जमातीच्या समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास" या प्रस्तुत अध्ययन विषयावरील शोधनिबंधाची पुढील गृहितके निश्चित केली आहेत.

1 आदिवासी जमातीच्या पारंपारिक जीवनपध्दतीमुळे समस्या निर्माण झाल्या आहेत.

2 आदिवासी जमातीच्या सामाजिक, आर्थिक व सास्कृतिक समस्या आहेत.

**आदिवासी जमातीच्या समस्या**

आदिवासी जमातीच्या पारंपारिक जीवनपध्दतीमुळे निर्माण होणाऱ्या समस्या व संस्कृतीच्या संपर्क व सहवासामुळे निर्माण होणाऱ्या समस्या बिकट, विदारक व गुंतागुंतीचे आहे. पारंपारिक जीवनशैलीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांमध्ये नवनवीन आजार, रोगराई, अन्नाचा तुटवडा, बेरोजगारी, बेकारी, इ. समस्याची भर पडली. परिणामी, आदिमांच्या जीवनात उदासिनता, नैराश्य निर्माण झाले. सत्यप्रिय, कष्टाळू, साधाभोळा, प्रामाणिक व धर्मवेडा आदिवासी या समस्यांपुढे शरणागती पत्करुन आपल्या अस्तित्वाची लढाई हारतो की काय अशी परिस्थिती निर्माण होत आहे. महाराष्ट्रातील आदिवासी जमातीच्या समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue 40 , Vol. 2 (Indexed) March. 2021 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

**1 सामाजिक समस्या**

महाराष्ट्रातील आदिम आदिवासी जमातीमध्ये बालविवाह प्रथा अस्तित्वात नव्हती. परंतू प्रगत हिंदूच्या संपर्कामुळे या प्रथेचा आदिवासी जमातीत उदय झाला. आदिवासी जमातीमध्ये वधूमुल्य संकल्पना प्रतिकात्मक होती. परंतू पुढे हिंदू समाजाच्या संपर्कामुळे आदिवासी जमातीमध्ये शिरकाव झाला. वधूमुल्य चढ्या भावाने व पैशाचे स्वरुपात मागितले जाऊ लागले. याला विरोध असणाऱ्या आदिवासींना मुली पळवणे सुरु केले. वाढत्या वधूमुल्यांसाठी कर्ज घेतले जाऊ लागले. अशाप्रकारे स्त्री-पुरुष संबंधाकडे निकोप दृष्टीने पाहणाऱ्या व प्रेमाला सर्वाधिक प्राधान्य देणाऱ्या आदिवासी जमातीमध्ये आधुनिक समाजाच्या संकुचित मतांचा शिरकाव झाला.युवागृहे ही जमातीतील यूवक-युवतींना सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक शिक्षण व संस्कार देणारी संस्था होती. आधूनिक व प्रगत समाजाकडून युवागृहे म्हणजे मौजमजेचे स्थान अनैतिकतेचा कळस अशी टिका होऊ लागली. परिणामी युवागृहाचे पतन झाले. त्यांच्या जागी अन्य शिक्षण संस्थेचे प्रतिरोपन न झाल्याने नवीन पिढीकडे परंपरागत संस्कृतीचे हस्तांतर कठीण बनले आहे.

मद्यपान हे आदिवासी जमातीमध्ये खोलवर रुजलेले आहे. मोहाची फुले, तांदळाचे पीठ, ताड, माड, इ. पासून बनविलेल्या परंपरागत दारु किंवा ताडी माडीमध्ये मादक पदार्थाचे प्रमाण कमी असते. यावर शासकीय बंदी असल्याने त्याची जागा मद्यार्काचे जास्त प्रमाण असणाऱ्या हातभट्टी व कारखान्यातून तयार होणाऱ्या दारुने घेतली. परिणामी मद्यसेवनामुळे शरीरावर, कार्यक्षमतेवर, मानसिकतेवर व कौटूंबिक जीवनावर विपरीत परिणाम झाला. आदिवासी समाज प्रगत समाजाच्या संपर्कात आल्याने आदिवासींना त्यांच्या अर्धनग्नतेचा संकोच वाटू लागला. त्यामुळे त्यांनीही पूर्ण पोषाख वापरणे सुरु केले. मात्र दररोज स्नान, साबणाने कपडे धूणे इ. ते करत नसल्याने अस्वच्छता व त्वचेचे रोग यांना निमंत्रण मिळाले.[2] नैसर्गिक परिस्थितीशी जुळणारा व आर्थिकदृष्ट्या किफायतशीर असणाऱ्या पारंपारिक पोषाखाचा त्याग करणे त्यांच्या दृष्टीने समस्या निर्माण करणारे ठरले.

**2 सांस्कृतिक समस्या**

बाह्य संस्कृतीच्या संपर्कामुळे आदिवासी जमातीनी प्रगत भाषेचा स्विकार करुन वापर सुरु केला. त्या त्या समाजाची भाषा ही समाजाची सांस्कृतिक मुल्यांना प्रतिबिंबित करते. मात्र स्वभाषेचा त्याग व नवीन भाषेचा पूर्णपणे आत्मसात न होणे यामुळे त्यांच्या सांस्कृतिक जीवनात पोकळी निर्माण झाली आहे. आदिवासी जमातीमध्ये धार्मिक श्रध्देला महत्व आहे. त्यांच्या वैयक्तिक व सामुदायिक अडचणीचे निवारण धर्म व जादूमुळे होत होते. शिवाय त्यांना मानसिक शांती व समाधान मिळत होते. धर्मांतर व प्रगताच्या संपर्कामुळे आदिम जीवनातील धर्म व जादू यांचा प्रभाव कमी होत आहे.[3] त्यामुळे धर्माच्या आधारावर उभी असलेली त्यांची सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्था कोलमडत आहे.

**3 आरोग्य विषयक समस्या**

महाराष्ट्रातील आदिवासी जमात प्रगत समाजाच्या बरोबरीने वागण्याचा प्रयत्न करतो. प्रगत समाजाप्रमाणे पोषाख वापरत आहे. परंतू पूर्ण पोषाख वापरण्याच्या सवयीचा अभाव, कपड्याची अस्वच्छता तसेच पावसाळ्यात ओले कपडे वापरणे इ. मुळे चर्मरोग व न्यूमोनियासारख्या आजारांना आदिवासी नेहमीच बळी पडतात. पोटभर व नियमित जेवणाचा अभाव, अपार कष्ट, व्यसनाधिनता, आरोग्यसंबंधी अज्ञान, आधुनिक वैद्यकीय उपचारासंबंधी नकारात्मक मानसिकता, अंधश्रध्दा, स्त्रियांचे लैंगिक शोषण इ.[4] अनेक कारणामुळे आदिवासी समाजाच्या आरोग्यविषयक समस्या अत्यंत गंभीर आहेत.

**4 आर्थिक समस्या**

आदिवासी जमातींना अनेक आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यांच्या आर्थिक दूस्थितीतून खालील समस्या निर्माण झाल्या आहेत.भौगोलिक पृथकतेमुळे स्थानांतरीत किंवा बदलती शेती हा आदिवासींच्या परंपरागत जीवनपध्दतीचा भाग आहे. पण ही शेती अत्यंत मागासलेली असून नवीन अवजारे उत्तम बी-बीयाणे, विविध प्रकारची खते, इ. चा वापर ठाऊक नसल्याने येणारे पीक अपूरे व निकृष्ट असते. त्यामुळे त्यावर वर्षभर आली गुजराण होणे कठीण असते.[5] त्यामुळे गरजा व खर्च भागविण्यासाठी कर्ज काढणे अपरिहार्य बनते व कर्ज बाजारीपणा ही समस्या निर्माण होते.

आदिवासी हे जंगलाचे अनिभषिक्त राजे होते. संपूर्ण जंगलावर आदिवासींचा अधिकार होता. जंगलतोड करुन परंपरागत शेती केली जात असे. ब्रिटीश कालखंडात नवीन जंगलविषयक कायदे निर्माण झाले. त्यामुळे पशुची शिकार करणे, दारु गाळणे, मध गोळा करणे इ. गोष्टीवर निर्बंध आले. या जंगलविषयक कायद्याचे स्वरुप आदिवासींना प्रतिकुल

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue 40 , Vol. 2 (Indexed) March. 2021 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

असल्याने आदिमांचे आर्थिक स्वातंत्र्य संपुष्टात आले व त्यांच्या आर्थिक जीवनावर विपरीत परिणाम झाला.आदिवासी जमातीची परंपरागत उपजीवीकेची साधने आहेत. आदिवासीची परंपरागत अर्थव्यवस्था साधी व वस्तुविनिमयावर आधारीत आहे. पैसा हे विनिमय माध्यम असलेल्या आधुनिक अर्थव्यवस्थेचा आदिवासी समाजात शिरकाव झाला. आणि नोटा, नाणी इ. च्या अचूक ज्ञाना अभावी आदिवासींचे व्यापारी, सावकार, कंत्राटदार, महाजनाकडून प्रचंड आर्थिक शोषण झाले. कर्जफेडीसाठी वेठबिगारीपणा सुरु झाला. तसेच आपल्या जमिनीही ते गमावून बसले आणि भूमिहीन मजूरासारखी त्यांची अवस्था झाली. जंगल परिसरात रस्त्यांची बांधणी, दुरुस्ती तसेच ऊसतोडणी, द्राक्षतोडणी, जंगलातील औषधी वनस्पती उपलब्ध करणे इ. विविध कामासाठी दलालामार्फत आदिवासी कामगार उपलब्ध झाले. नाममात्र मजुरी दर, आर्थिक अज्ञान, इत्यादी बाबीमुळे त्यांचे आर्थिक शोषण केले गेले.[6] शिवाय स्थलांतरणाचा प्रश्न निर्माण झाला. कामाच्या ठिकाणी निकृष्ट निवास व्यवस्था, आरोग्य सुविधांचा अभाव यामुळे त्यांच्या समस्यास आणखी वाढल्या.

**आदिवासी जमातीच्या विकासाचे प्रयत्न**

अनेक वर्ष विकासापासून दूर असलेल्या आदिवासीचे सामाजिक आणि आर्थिक हितसंबंध जोपासणे, सर्व प्रकारच्या शोषणापासून त्यांचे संरक्षण करणे, राहणीमानाचा दर्जा उंचावून प्रगत समाजाच्या बरोबरीने विकासाच्या संधी उपलब्ध करुन आदिवासींना मुख्य प्रवाहात आणणे इ. उद्दिष्ट्ये प्राप्त करण्यासाठी पुढील उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

**1 घटनात्मक तरतुदी व उपाययोजना**

भारतीय संविधानामध्ये आदिवासीच्या संरक्षणासाठी पुढील तरतुदी करण्यात आल्या आहेत. कलम 15(4), 16(4) , 17, 23(1), 23(2), 25 (2), 29 (1), 46, 330 (1), 332, 338 नुसार अनुसूचीत जाती आणि अनुसुचित जमातीच्या विकासासाठीच्या तरतुदी आहेत.[7]

**2 शासकीय योजना**

आदिवासी जमातीच्या विकाससंदर्भात शासकीय स्तरावर विविध उपाययोजना केल्या जातात. या माध्यमातून आदिवासी जमातीच्या विकासाचे उद्दिष्ट साध्य केल्या जाते. जंगल व जमीन विषयक तरतुद , शासकीय वस्तीगृह , अनुदानित आश्रमशाळा सुरु करणे, ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना, भुमिहीन आदिवासी जमातीच्या शेतमजूर कुटूंबासाठी स्वाभिमान व सबलीकरण योजना, वीजपंप / तेलपंप पुरविणे,राजीव गांधी अपघात विमा योजना, कन्यादान योजना,घरकूल योजना,घरगुती गॅस संचचा पुरवठा , महाराष्ट्रातील आदिवासीच्या शिक्षणासाठी आश्रमशाळा असून त्यापैकी 409 आश्रमशाळा शासनामार्फत तर 312 आश्रमशाळा अनुदानित स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येतात. बालवाड्या सुरु करणे, पुस्तके वह्या, आदिवासी विद्यार्थ्यांना गणवेश व लेखन सामुग्री पुरविणे, उपस्थिती भत्ता देणे, विद्यावेतन, शैक्षणिक सवलती, मुलींना मोफत शिक्षण, साक्षरता मोहीम इ. योजना राबविण्यात येतात.[8] आदिवासी जमातीतील लोककरीता दुभत्या जनावरांचे वाटप करतांना संकरीत गायी, म्हशीचे वाटप केले जाते. यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते. यासाठी आदिवासी दुधसंघाची स्थापना करण्यात आलेली आहे. आदिवासी क्षेत्रात 50 हजार लिटर क्षमतेचा एक दुध प्रकल्प स्थापन करण्यात आला आहे. या योजनेत मत्स्योत्पादनात वाढ करणे, मच्छिमार युवकांना प्रशिक्षण, मत्सबीज उत्पादन, मत्स्यसंवर्धन मासेमारी साधनांच्या खरेदीसाठी अर्थसहाय्य, मच्छिमाराचा विमा उतरवण्यासाठी अनुदान इ. योजना राबविल्या जातात.

**निष्कर्ष :**

1. आदिवासी जमातीच्या पारंपारिक जीवनशैलीमुळे नवनवीन आजार, रोगराई, अन्नाचा तुटवडा, बेरोजगारी, बेकारी, इ. समस्या निर्माण झाल्या आहेत.
2. आदिवासी जमातीच्या विकासासाठी विविध कल्याणकारी योजना केंद्रशासन, राज्यशासन व जिल्हा शासनाच्या वतीने राबविल्या जातात.
3. बाह्य संस्कृतीच्या संपर्कामुळे आदिवासी जमातीनी स्वभाषेचा त्याग व नवीन भाषेचा पूर्णपणे आत्मसात न होणे यामुळे त्यांच्या सांस्कृतिक जीवनात पोकळी निर्माण झाली आहे.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue 40 , Vol. 2 (Indexed) March. 2021 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

**सारांश :**

आदिवासी जमात ही भारतीय समाजव्यवस्थेतील महत्वाचा घटक आहे. या जमातीची स्वतंत्र संस्कृती आहे. जगातील सर्व देशात आदिवासी जमाती अस्तीत्वात आहे. विशेषत: आशिया, अमेरिका आणि अफ्रिका या खंडातील देशात आजही आदिवासी जमाती मोठ्या प्रमाणावर आढळतात. युरोपमध्ये मोठ्या प्रमाणात आधुनिकीकरण झाल्यामुळे या आदिवासी जमाती ओळखणे कठिण आहे. भारतीय समाजव्यवस्थेतील एक महत्वाचा समाज घटक म्हणजे आदिवासी जमात आहे. भारतीय समाज विविध जातीमध्ये विभाजित झाला आहे. भारतामध्ये एक हजारपेक्षा जास्त जाती आणि उपजाती आहे. या जाती प्रमाणेच आदिवासी जमाती आहे. देशातील सर्वच राज्यामध्ये कमी अधिक प्रमाणात आदिवासी जमाती आढळतात. भारतामध्ये 250 आदिवासी जमाती आहेत. आदिवासी जमाती आणि उपजातीचा विचार केल्यास ही संख्या 450 च्या वर आहे. काळाच्या ओघात मानवी जीवनाच्या कक्षा रुंदावत गेल्या आहे. अनेक क्षेत्रात क्रांती घडुन आली. मानवी विकासाच्या या प्रक्रियेपासून व प्रवाहापासुन आदिवासी जमात दूर होत आहे

**संदर्भसूची**

1) देवगावकर, शैलजा., देवगांवकर, श.गो., (2001), आदिवासी विश्व, नागपूर, आनंद प्रकाशन, 1.
2) फडके,सुधीर.,(1963), महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न, पुणे, जोशी आणि लोखंडे प्रकाशन, 6.
3) रावत, हरिकृष्ण., (2002), समाजशास्त्र विश्वकोष, नई दिल्ली, रावत पब्लिकेशन्स, 67.
4) गारे, डॉ. गोविंद., (1986), आदिवासी विकासाचा आर्थिक कार्यक्रम, पुणे, आदिवासी विकास व प्रशिक्षण संस्था, 10.
5) वार्षिक आदिवासी उपयोजना, (2008-09), महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, 462.
6) वार्षिक आदिवासी उपयोजना, (2008-09), महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, 463.
7) जाधव, तुकाराम, (2002), (संपादक), महाराष्ट्र वार्षिकी 2012, पुणे, द युनिक ॲकेडमी, 365.
8) गारे, डॉ. गोविंद., (1986), आदिवासी विकासाचा आर्थिक कार्यक्रम, पुणे, आदिवासी विकास व प्रशिक्षण संस्था, 10



44